महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार





छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २४८ वे | दिनांक : ०४/०९/२०२६ | वार : शुक्रवार

## कॉकरोच जनता पार्टी मध्ये मोठी फूट आंदोलनाचा सौदा केल्याचा आरोप



**नवी दिल्ली :** जंतर-मंतरवरील आंदोलनानंतर देशभरात चर्चेत आलेल्या कॉकरोच जनता पार्टीमध्ये (CJP) उभी फूट पडली आहे. सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासोबत हातमिळवणी करून आंदोलनाचा सौदा केला, असा गंभीर आरोप करत मूळ आंदोलनातील प्रमुख कार्यकर्ते मनीष ब्रह्मभट्ट यांनी गुरुवारी (3 सप्टेंबर) 'कॉकरोच जनता पार्टी डेमोक्रेटिक' (CJP-D) या नव्या राजकीय पक्षाची अधिकृत घोषणा केली. या बंडामुळे युवा आंदोलनाच्या नावाखाली स्थापन झालेल्या या पक्षात अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. अहमदाबादचे रहिवासी असलेले आणि आंदोलनात सुरुवातीपासून सक्रिय राहिलेले मनीष ब्रह्मभट्ट यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन अभिजीत दिपके यांच्यावर थेट तोफ डागली. "जंतर-मंतरवरील आंदोलन देशातील सामान्य जनतेच्या आणि विद्यार्थ्यांच्या घामातून उभे राहिले होते. मात्र, आंदोलन यशस्वी होताच ते पूर्णपणे विकले गेले. अभिजीत दिपके यांनी घरी बसून स्वतःच्या मर्जीने १२ लोकांची राष्ट्रीय कोअर टीम तयार केली. यासाठी रस्त्यावर उतरलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याला, कार्यकर्त्याला विश्वासात घेण्यात आले नाही.“ अरविंद केजरीवाल आणि अभिजीत दिपके यांच्यात 'पॉलिटिकल डील' झाल्याचा दावा करत ब्रह्मभट्ट म्हणाले, "केजरीवाल यांचा राजकीय इतिहासच आंदोलनांचा गैरवापर करून स्वतःची सत्ता मिळवण्याचा राहिला आहे. त्यांनी अण्णा हजारेंच्या आंदोलनाचा वापर करून स्वतःची राजकीय पोळी भाजली आणि नंतर मूळ तत्त्वे बाजूला सारली. आता तोच प्रकार कॉकरोच जनता पार्टीसोबत घडला असून केजरीवाल यांनी दिपके यांच्या माध्यमातून संपूर्ण आंदोलन हायजॅक केले आहे.“ "झारखंडमध्ये जेव्हा विद्यार्थ्यांचे मोठे आंदोलन झाले, तेव्हा सीजेपीचे नेते तिकडे फिरकलेही नाहीत. कारण भाजपशासित राज्यांव्यतिरिक्त इतर विरोधी पक्षांच्या सत्ता असलेल्या राज्यांमध्ये आंदोलने न करण्याचे आदेश त्यांच्या 'बॉस'कडून म्हणजे केजरीवालांकडून दिले गेले होते.“ नव्या कार्यकारणीतील रचनेवर आक्षेप नोंदवताना ब्रह्मभट्ट यांनी सीजेपीच्या सर्वसमावेशकतेवर प्रश्न उपस्थित केले. “राष्ट्रीय कोअर टीममध्ये एकाही सामान्य विद्यार्थ्याचा समावेश करण्यात आलेला नाही. आंदोलनाच्या काळात ज्या शीख समाजाने गुरुद्वारांचे दरवाजे उघडून लंगर वाटले, त्या समाजातील एकाही शीख प्रतिनिधीला स्थान मिळाले नाही. तसेच एकाही मुस्लिम पुरुषाला या टीममध्ये घेण्यात आलेले नाही.“ "आरजेडी, समाजवादी पार्टी, शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या ज्या कार्यकर्त्यांनी पक्षाचे जोडे बाजूला ठेवून या जनआंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला होता, त्यापैकी कोणालाही विश्वासात घेतले गेले नाही.“ आपण भाजपच्या पाठीशी नसल्याचे स्पष्ट करत मनीष ब्रह्मभट्ट म्हणाले की, कॉकरोच आंदोलनाची मूळ कल्पना ही देशातील भ्रष्ट व्यवस्थेविरोधात लढण्याची होती. त्यामुळे कोणत्याही एका नेत्याची किंवा 'आप'ची हुकूमशाही मोडून काढण्यासाठी आणि प्रत्येक राज्याला समान अधिकार देण्यासाठी 'CJP डेमोक्रेटिक' ची स्थापना करण्यात आली असून, राज्यनिहाय कार्यकर्त्यांना एकत्र आणून हा लढा पुढे सुरू ठेवला जाईल.

## नळदुर्ग किल्ल्यावरून आईने तीन मुलांसह घेतली उडी



**धाराशिव :** काही दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगरमधील खवड्या डोंगरावर एकाच कुटुंबातील तिघांचा डोंगरावरून खाली कोसळून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना ताजी असतानाच, आता धाराशिवमधूनही तितकाच धक्कादायक प्रकार समोर आला आहे. धाराशिव जिल्ह्यातील नळदुर्ग किल्ल्यावरून एका आईने आपल्या तीन लहान मुलांसह उडी घेतल्याची माहिती समोर आली आहे. या भीषण घटनेत आई आणि तिच्या एका मुलाचा मृत्यू झाला असून, दोन चिमुकल्या मुली गंभीर जखमी झाल्या आहेत.

छत्रपती संभाजीनगरमधील तीसगाव परिसरात असलेल्या खवड्या डोंगरावर काही दिवसांपूर्वी अत्यंत हृदयद्रावक घटना घडली होती. आत्महत्या पाऊल उचलण्याच्या उद्देशाने डोंगरावर गेलेल्या 18 वर्षीय मुलाला वाचवण्यासाठी त्याचे आई-वडील धावले होते. मात्र, मुलाला वाचवण्याच्या प्रयत्नात वडीलही त्याच्यासोबत खाली कोसळले. मुलगा आणि पती डोळ्यांसमोर दरीत पडल्याचा धक्का सहन न झाल्याने आईनेही डोंगरावरून उडी घेतल्याचे समोर आले होते. या घटनेत कुणाल मुरलीधर चांदवडे, मुरलीधर चांदवडे आणि संगीता चांदवडे या तिघांचा मृत्यू झाला होता.

या घटनेची चर्चा थांबत नाही तोच आता धाराशिवमधील नळदुर्ग किल्ल्यावर पुन्हा एक भयावह घटना घडली आहे. मात्र, नळदुर्गमधील या घटनेमागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, उमरगा तालुक्यातील वंताळा गावातील रहिवासी अश्विनी तानाजी मोहिते (वय 30) या गुरुवारी, 3 सप्टेंबर रोजी आपल्या तीन लहान मुलांसह नळदुर्ग किल्ल्यावर आल्या होत्या. यावेळी त्यांनी किल्ल्याच्या उंच तटबंदीवरून आपल्या तिन्ही मुलांसह खाली उडी घेतल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

किल्ल्यावरून खाली पडल्यानंतर झालेल्या गंभीर दुखापतीमुळे अश्विनी मोहिते आणि त्यांच्या एका मुलाचा मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली. हा प्रकार लक्षात येताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

या घटनेत दोन लहान मुली गंभीर जखमी झाल्या आहेत. नागरिकांच्या मदतीने त्यांना तातडीने नळदुर्ग येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी धाराशिव येथील शासकीय सर्वोपचार रुग्णालयात हलवण्यात आले आहे. सध्या दोन्ही मुलींवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.

घटनेची माहिती मिळताच नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. महिलेने आपल्या तीन लहान मुलांसह एवढे टोकाचे पाऊल नेमके कोणत्या कारणामुळे उचलले, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. यामागे कौटुंबिक वाद, मानसिक तणाव किंवा अन्य काही कारण आहे का, याचा पोलीस सर्व बाजूंनी तपास करत आहेत.

या घटनेमुळे वंताळा गावात शोककळा पसरली आहे. एका आईसह तिच्या मुलाचा झालेला दुर्दैवी मृत्यू आणि दोन चिमुकल्या मुलींची गंभीर प्रकृती यामुळे परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास नळदुर्ग पोलीस करत आहेत.

## मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर सरकारचा मोठा निर्णय

**छत्रपती संभाजीनगर :** मराठा आरक्षणाच्या मागणीवरून मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू असतानाच सरकारने कुणबी, मराठा कुणबी आणि कुणबी मराठा समाजातील पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्र मिळवून देण्याच्या प्रक्रियेला वेग देण्यासाठी मोठी प्रशासकीय मोहीम हाती घेतली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील 8 जिल्ह्यांमध्ये 10 ते 17 सप्टेंबरदरम्यान मंडळ स्तरावर विशेष शिबिरे घेण्याचे आदेश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. या विशेष मोहिमेत जुन्या कुणबी नोंदी शोधणे, उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी करणे, अर्ज स्वीकारणे आणि पात्र लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही जलदगतीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जात प्रमाणपत्रासोबतच जात पडताळणी प्रमाणपत्र मिळवताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात उपजिल्हाधिकारी दर्जाच्या नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचेही आदेश देण्यात आले आहेत. ही मोहीम शासनाच्या सर्वोच्च प्राधान्याची बाब असल्याचे विभागीय आयुक्तांनी स्पष्ट केले असून, कामात कोणत्याही प्रकारची हयगय खपवून घेतली जाणार नसल्याचा इशाराही देण्यात आला आहे. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी 3 सप्टेंबर रोजी जारी केलेल्या आदेशानुसार छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर आणि धाराशिव या 8 जिल्ह्यांमध्ये विशेष शिबिरांचे आयोजन केले जाणार आहे. मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री यांनी 2 सप्टेंबर रोजी दिलेल्या निर्देशांच्या आधारे ही कार्यवाही करण्यात येत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ सप्टेंबर २०२६

## समस्या मांडण्यासाठी विद्यार्थ्यांनी पोर्टलचा सकारात्मकतेने वापर करणे आवश्यक - मा. कुलगुरू डॉ. व्यंकट गिते यांचे प्रतिपादन




**नाशिक :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या जलद आणि पारदर्शक पद्धतीने विद्यापीठापर्यंत पोहोचण्यासाठी पोर्टल सारख्या माध्यमाची गरज असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. व्यंकट गिते यांनी केले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या मा. व्यवस्थापन परिषद बैठकीत विद्यापीठातर्फे ऑनलाइन विद्यार्थी तक्रार निवारण पोर्टलचा शुभारंभ मा. कुलगुरू डॉ. व्यंकट गिते यांच्या हस्ते करण्यात आला. या बैठकीस अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. व्यंकट गिते समवेत व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. सचिन मुंबरे, डॉ. विलास वांगीकर, डॉ. मिलिंद आवारे, डॉ. विठ्ठल धडके, डॉ. राजकुमार पाटील, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू, वित्त व लेखाधिकारी बी. जे. सोनकांबळे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. देवेंद्र पाटील, अधिष्ठाता डॉ. किरण पाटोळे उपस्थित होते. यावेळी विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. व्यंकट गिते यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना शैक्षणिक अडचणी थेट विद्यापीठापर्यंत पोहोचविण्यासाठी ऑनलाईन पोर्टल (SGRC) उपलब्ध करुन देण्यात आहे. विद्यार्थ्यांना अडचणी मांडण्यासाठी योग्य व्यासपीठ मिळाले आहे. प्राप्त तक्रारींच्या निवारणासाठी स्वतंत्र कक्षामार्फत कार्यवाही करण्यात येईल. संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना समस्या मांडण्यासाठी विद्यापीठाकडून सुलभ आणि पारदर्शक माध्यम उपलब्ध झाले आहे. तंत्रज्ञानाचा वापर करुन कार्यपध्दतीत अधित सुलभता येण्यासाठी विद्यापीठाकडून लवकरच 'व्ही.सी. पोर्टल' सुरू करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना, संघभावना, सकारात्मक ऊर्जा आणि मानसिक प्रसन्नता वाढविण्याच्या दृष्टीकोनातून विद्यापीठातर्फे 'कुलगुरू चषक' क्रीडा विषयक उपक्रम सुरु करण्यात येणार आहे. या उपक्रमास विद्यापीठाच्या मा. व्यवस्थापन परिषदेने मंजुरी प्रदान केली आहे. या उपक्रमाव्दारे विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुणांना चालना मिळणार आहे. विद्यापीठाच्या 'कुलगुरू चषक'अंतर्गत राज्यातील विविध महसुली विभागांमध्ये आंतरमहाविद्यालयीन विभागीय आणि आंतरविभागीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असून अंतिम नाशिक येथे होईल. शैक्षणिक उपक्रमांबरोबरच त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यालाही समान महत्त्व देणे गरजेचे असल्याने विद्यार्थ्यांसाठी 'कुलगुरू चषक' उपक्रम महत्वपूर्ण ठरेल असे त्यांनी सांगितले. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी मा. कुलगुरु महोदय यांच्या संकल्पनेतून सुरु करण्यात आलेले पोर्टलमुळे विद्यार्थी व विद्यापीठ प्रशासन यांच्यात संवादात अधिक पारदर्शकता वाढेल. कुलगुरु चषकच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात भरारी घेण्यासाठी नवे व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठातर्फे सुरु करण्यात आलेले ऑनलाइन विद्यार्थी तक्रार निवारण पोर्टल www.muhs.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. याबाबत सर्व संलिग्नित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना माहिती द्यावी असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात येत आहे. विद्यापीठाच्या मा. व्यवस्थापन परिषद बैठकीस विद्यापीठाचे विविध अधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## इकरा पब्लिक स्कूलमध्ये पालक-शिक्षक मेळावा उत्साहात



**जळगाव :** इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जळगाव येथे इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठीपालक-शिक्षक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. नुकत्याच घेण्यात आलेल्या प्रथम घटक चाचणी परीक्षेच्या निकालाची माहिती यावेळी पालकांना देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याची स्वतंत्र वैयक्तिक शैक्षणिक फाईल तयार करण्यात आली असून, त्यामध्ये विद्यार्थ्याचा शैक्षणिक रेकॉर्ड जतन करण्यात आला आहे.पालकांना त्यांच्या पाल्याचा रेकॉर्ड दाखवून शिक्षकांनी शैक्षणिक प्रगती व आवश्यक सुधारणांबाबत मार्गदर्शन केले. मेळाव्यास पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.यावेळी विद्यालयाचे प्राचार्य शेख शकील यांनी पालकांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पालक, शिक्षक आणि विद्यार्थी या तिन्ही घटकांनी समन्वयाने कार्य करणे आवश्यक असल्याचे सांगितले. इश्तियाक सर यांनी सेमी-इंग्लिश माध्यमाची माहिती देत पालकांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन केले. पालकांच्या वतीने रोशन शाह यांनी विद्यालयाकडून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांचे कौतुक केले. तसेच शिष्यवृत्ती, क्रीडा, मिशन AICU,इंटरमिजिएट, कॅलिग्राफी आणि MSCIT यांसारख्या विविध उपक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक केले.मेळाव्यादरम्यान झिया मॅडम व अनीसा मॅडम यांनी पालकांना विद्यार्थ्यांचे निकाल व शैक्षणिक रेकॉर्ड समजावून सांगत वैयक्तिक समुपदेशन केले. पालकांनीही शिक्षकांशी संवाद साधून आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीबाबत माहिती घेतली.विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शाळा आणि पालक यांच्यात सातत्यपूर्ण संवाद व समन्वय आवश्यक असून, संयुक्त प्रयत्नांतून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला आणि सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा सकारात्मक संदेश या पालक-शिक्षक मेळाव्यातून देण्यात आला.

## मुरूममध्ये राष्ट्रीय लघुउद्योग दिनानिमित्त महिला बचत गटांसाठी मार्गदर्शन शिबिर संपन्न




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** गणेश नगर येथे राष्ट्रीय लघुउद्योग दिनाचे औचित्य साधून 'रोटरी क्लब मुरूम सिटी'च्या वतीने महिला बचत गटांसाठी लघुउद्योगांसंबंधी विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन मंगळवारी (ता. १) करण्यात आले. या शिबिरात महिलांना स्वयंरोजगाराचे धडे देत आर्थिक स्वावलंबनाचे महत्त्व पटवून देण्यात आले.कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून धाराशिव येथील उद्योग व सेवा केंद्राचे सहाय्यक आयुक्त अमोल बळे उपस्थित होते. त्यांनी महिलांना मार्गदर्शन करताना सांगितले की, महिलांनी शिलाई, पापड, शेवया, लोणचे, बटाटा चिप्स, कांदा पावडर, चटण्या आणि मसाले यासारखे लघुउद्योग सुरू करून स्वत:चा आर्थिक विकास साधावा. जिल्हा उद्योग केंद्रातर्फे महिलांसाठी विविध कल्याणकारी योजना, व्यवसाय प्रकल्प, सुलभ कर्ज आणि शासकीय अनुदाने मंजूर केली जातात. बचत गटांमधील महिलांनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच, उपजत कलेतूनच खऱ्या अर्थाने उद्योगाची निर्मिती होते, असा मौलिक विचार त्यांनी मांडला.कार्यक्रमास जिल्हा लघुउद्योग धाराशिवचे सहाय्यक अधिकारी अभिजीत लांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. व्यासपीठावर सरपंच तथा महिला बचत गटाच्या सीआरपी उषा चव्हाण, पोलीस पाटील कलावती चव्हाण, रोटरी क्लब मुरूम सिटीचे अध्यक्ष कल्लय्या स्वामी, सचिव प्रकाश रोडगे, मल्लिकार्जुन बदोले, भूषण पाताळे आणि संतोष कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच विद्या जागृती संस्थेचे प्रतिनिधी राजेंद्र घोडके व रंजना लाळे यांचीही विशेष उपस्थिती लाभली.यावेळी रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बचत गटाच्या महिलांना प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. कार्यक्रमास बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. परिसरातील महिला वर्गात या उपक्रमाबद्दल उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

## वास्तवात जगतांना

भावनांच्या बाजारात
कल्पनेला वाव नसतो.
सत्य परिस्थिती दिसता,
जवळचाही दूर बसतो. १

अरे वास्तवात जगताना,
इथे खूप अडचणी येतात.
ज्यांच्यावर विश्वास असतो,
तेच ऐनवेळी धोका देतात. २

भावनेच्या भरात वाहून,
नको शब्द कुणाला देऊ.
सारे माझे माझे म्हणून,
सर्वांची काळजी घेऊ. ३

भावनांना काळजात,
का असे दाबून ठेऊ.
आला कुणी अंगावर तर,
त्याला आता शिंगावर घेऊ. ४

खूप झाले आश्वासने,
आता फक्त विकास हवा.
नव्या नव्या विचारांनी,
आता घडणार भारत नवा. ५



**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ सप्टेंबर २०२६


## भूपतीच्या नियुक्तीचा गोंडवाना विद्यापीठाने पुनर्विचार करावा- प्रा. डॉ. संतोष डाखरे

**गडचिरोली** : माओवादी चळवळीतील वरिष्ठ नेता म्हणून कार्यरत राहिलेल्या मलोजुला वेणुगोपाळ राव ऊर्फ 'भूपती' यांची गोंडवाना विद्यापीठाच्या 'एकल' उपक्रमात समन्वयक म्हणून करण्यात आलेली नियुक्ती ही गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या भावना दुखावणारी असून, विद्यापीठाने या नियुक्तीचा तातडीने पुनर्विचार करावा, अशी मागणी प्रा. डॉ. संतोष डाखरे, सदस्य, राज्यशास्त्र अभ्यास मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी केली आहे.भूपती हा दीर्घकाळ माओवादी चळवळीतील वरिष्ठ नेता म्हणून कार्यरत होता. त्याच्याविरुद्ध गडचिरोली जिल्ह्यात 71 गुन्हे दाखल असून त्यापैकी 10 गुन्हे हत्या-संबंधित असल्याची नोंद आहे. माओवादी कारवाया, सशस्त्र हल्ले, हत्या, पोलिसांवरील हल्ले आणि इतर गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांशी त्याचे नाव जोडले गेले आहे. विशेषतः 2019 मधील जांभूरखेडा-कुरखेडा परिसरातील माओवादी हल्ल्यात 15 पोलीस जवान आणि एका नागरिकाचा मृत्यू झाला होता. या प्रकरणात भूपतीसह माओवादी संघटनेतील वरिष्ठ नेत्यांविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले होते. तसेच 2010 च्या दंतेवाडा हल्ल्यात 76 CRPF जवानांच्या मृत्यूशी संबंधित माओवादी कारवाईच्या नियोजनात भूपतीची भूमिका असल्याचे सिद्ध झाले होते.याशिवाय माओवादी चळवळीच्या काळात शासकीय यंत्रणा, पोलीस दल, सुरक्षा व्यवस्था आणि सार्वजनिक मालमत्तेविरोधात हिंसक कारवाया, स्फोट, जाळपोळ व विध्वंसक कृत्ये करण्यात आल्याचे विविध प्रकरणांतून समोर आले आहे. त्यामुळे अशा पार्श्वभूमीच्या व्यक्तीची आदिवासी समाजाच्या विकासाशी संबंधित विद्यापीठाच्या उपक्रमात समन्वयक म्हणून नियुक्ती करणे हे अत्यंत गंभीर आणि संवेदनशील प्रकरण आहे.गोंडवाना विद्यापीठाची स्थापना आदिवासी समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाच्या उद्देशाने झाली आहे. आदिवासींच्या हक्कांसाठी आणि विकासासाठी काम करणाऱ्या या विद्यापीठाने माओवादी हिंसाचाराच्या गंभीर आरोपांना सामोरे गेलेल्या व्यक्तीला आदिवासी विकासाशी संबंधित उपक्रमाची जबाबदारी देणे हे विद्यापीठाच्या वैचारिक भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे, असे प्रा. डॉ. डाखरे यांनी म्हटले आहे.गडचिरोली जिल्ह्यातील अनेक आदिवासी कुटुंबांनी नक्षलवादी हिंसाचारात आपले नातेवाईक गमावले आहेत. पोलीस, सुरक्षा दलांचे जवान तसेच सर्वसामान्य नागरिक यांना या हिंसाचाराची मोठी किंमत मोजावी लागली आहे. त्यामुळे माओवादी हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवरील व्यक्तीला आदिवासी कल्याणाशी निगडित महत्त्वाची जबाबदारी देताना विद्यापीठ प्रशासनाने स्थानिक आदिवासी समाजाच्या भावना, नक्षल हिंसाचाराने प्रभावित कुटुंबांच्या वेदना आणि विद्यापीठाची सामाजिक जबाबदारी यांचा विचार करणे आवश्यक आहे. आदिवासी समाजाला समर्पित असलेल्या गोंडवाना विद्यापीठाने आदिवासी समाजाच्या जखमांवर मीठ चोळणारा कोणताही निर्णय घेऊ नये. माओवादी हिंसाचारामुळे ज्यांनी आपले कुटुंबीय गमावले, त्या नागरिकांच्या भावनांचाही विद्यापीठाने विचार करावा. अशा व्यक्तीची नियुक्ती ही केवळ एका व्यक्तीच्या नियुक्तीचा विषय नसून विद्यापीठाच्या वैचारिक भूमिकेचा प्रश्न आहे. असेही डॉ. डाखरे यांनी स्पष्ट केले.या नियुक्तीमुळे विद्यापीठाच्या निर्णयप्रक्रियेची पारदर्शकता, नियुक्तीचे निकष आणि संबंधित व्यक्तीची पार्श्वभूमी याबाबतही प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे नियुक्तीपूर्वी कोणते निकष विचारात घेण्यात आले, संबंधित व्यक्तीविरुद्ध दाखल असलेल्या गंभीर गुन्ह्यांचा विचार करण्यात आला होता का आणि आदिवासी समाजाच्या प्रतिनिधी संस्थांशी याबाबत चर्चा करण्यात आली होती का, याबाबत विद्यापीठ प्रशासनाने स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.गोंडवाना विद्यापीठाने या नियुक्तीचा पुनर्विचार करून ती रद्द अथवा स्थगित करावी आणि आदिवासी समाजाच्या भावना व विद्यापीठाची प्रतिष्ठा लक्षात घेऊन योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी प्रा. डॉ. संतोष डाखरे यांनी केली आहे.

**प्रा. डॉ. संतोष डाखरे (सदस्य, राज्यशास्त्र अभ्यास मंडळ गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली)**


## प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.


## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे उद्घाटन



**उमरगा :** येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अर्जुन कटके होते.यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी विद्यार्थ्यांनी जीवनात यश मिळविण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि सातत्य या त्रिसूत्रीचा अवलंब करावा, असे आवाहन केले. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवी पुरेशी नसून विद्यार्थ्यांनी कौशल्य, तंत्रज्ञानाचे ज्ञान, संवादकौशल्य, नेतृत्वगुण आणि उद्योजकीय दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या माध्यमातून शिक्षण, कौशल्य विकास व रोजगाराभिमुख प्रशिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. अंगणवाडी-बालवाडी, पत्रकारिता, दुग्ध व्यवसाय आणि ड्रेस डिझाईन यांसारख्या अभ्यासक्रमांचा विद्यार्थ्यांनी व इच्छुकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. डिजिटल युगात संगणक, इंटरनेट, डिजिटल व्यवहार तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांचे ज्ञान आत्मसात करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.अध्यक्षीय समारोपात डॉ. अर्जुन कटके यांनी करिअर कट्टा उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी उपलब्ध करिअर संधींची माहिती घेऊन योग्य नियोजन करावे, असे सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस. एल. राठोड यांनी केले, तर आभार डॉ. प्रवीण गायकवाड यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. शिवाजी हुसे यांच्या 'कृत्रिम बुद्धिमत्ता : संधी आणि आव्हाने' पुस्तकाचे प्रकाशन



**कन्नड (प्रतिनिधी)** - येथील शिवाजी महाविद्यालयात मराठी विभाग व भाषा संशोधन केंद्राचे प्रमुख प्रा. डॉ. शिवाजी हुसे आणि उदगीर येथील प्रा. डॉ. नरसिंग कदम यांनी संपादित केलेल्या कैलाश पब्लिकेशन प्रकाशित 'कृत्रिम बुद्धिमत्ता : संधी आणि आव्हाने' या वैचारिक ग्रंथाचे प्रकाशन नुकतेच मोठ्या उत्साहात संपन्न झाले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक डॉ. अंबादास सगट यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा पार पडला.AI समजून घेण्यासाठी उपयुक्त ग्रंथ - प्राचार्य डॉ. भोसलेयावेळी बोलताना प्राचार्य डॉ. विजय भोसले म्हणाले, "आज आपण कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) युगात जगत आहोत. शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, साहित्य अशा प्रत्येक क्षेत्रात AI ने शिरकाव केला आहे. अशा परिस्थितीत AI म्हणजे नेमके काय? त्याचा मानवी जीवनावर काय परिणाम होणार आहे? त्यातून कोणत्या संधी निर्माण होणार आहेत आणि कोणती आव्हाने उभी राहणार आहेत, हे समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. डॉ. हुसे आणि डॉ. कदम यांनी संपादित केलेला हा ग्रंथ याच सर्व प्रश्नांची उकल करणारा असून विद्यार्थी, शिक्षक, संशोधक आणि सर्वसामान्य वाचकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे."समकालाशी जोडणारे संपादन - डॉ. सगटज्येष्ठ साहित्यिक डॉ. अंबादास सगट म्हणाले, "प्रा. डॉ. शिवाजी हुसे हे सातत्याने नवनवीन, समकालीन आणि समाजाच्या जिव्हाळ्याच्या विषयांवर लेखन व संपादन करीत असतात. 'तिफण' त्रैमासिकाच्या माध्यमातून त्यांनी शेती, साहित्य आणि संस्कृतीचा वेध घेतला. आता त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या अत्याधुनिक विषयाला मराठीत आणून मराठी वाचकांना जागतिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. हे पुस्तक केवळ तांत्रिक माहिती देणारे नसून मानवी संवेदना आणि तंत्रज्ञान यांच्यातील नात्याचा शोध घेणारे आहे."संपादकांचे मनोगतप्रारंभी प्रास्ताविक व मनोगत व्यक्त करताना डॉ. शिवाजी हुसे म्हणाले, "कृत्रिम बुद्धिमत्ता ही आता भविष्याची गोष्ट राहिलेली नाही, ती वर्तमान आहे. त्यामुळे त्याला घाबरून न जाता, त्याला समजून घेऊन त्याचा सकारात्मक वापर कसा करता येईल, यासाठी हा ग्रंथ आम्ही तयार केला आहे. या पुस्तकात महाराष्ट्रातील अनेक तज्ज्ञांचे अभ्यासपूर्ण लेख समाविष्ट आहेत."या ग्रंथामध्ये AI चे साहित्य, भाषा, शिक्षण, शेती आणि रोजगारावर होणारे परिणाम यावर सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. पाटील यांनी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ सप्टेंबर २०२६


## राष्ट्रसेवेची ३५ वर्षे पूर्ण करून सैन्यातून निवृत्त झालेले सुर्यकांत पंचगल्ले यांचा उदगीरमध्ये अभूतपूर्व सत्कार




**उदगीर (प्रतिनिधी) :** देशसेवा हीच ईश्वरसेवा मानत भारतीय सैन्य दल आणि वायुदलात तब्बल ३५ वर्षे प्रामाणिक, निष्कलंक आणि कर्तृत्ववान सेवा बजावून सेवानिवृत्त झालेले अतनुर (ता. जळकोट) येथील सुपुत्र तथा सैनिक श्री. सुर्यकांत वैजनाथराव पंचगल्ले यांचा पंचगल्ले परिवार, जिव्हाळा ग्रुप व मित्र परिवाराच्या वतीने उदगीर येथे बुधवारी (ता. १) रोजी जल्लोषात आणि संस्मरणीय सोहळ्यात स्वागत व मानपत्र देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.श्री. सुर्यकांत पंचगल्ले यांनी सुरुवातीला भारतीय सैन्य दलात (आर्मी) २२ वर्षे उत्तम सेवा बजावली. यादरम्यान त्यांनी जम्मू, राजस्थान, पंजाब, लडाख, पुंछ यासारख्या देशाच्या अतिसंवेदनशील व आव्हानात्मक भागात सुरक्षेच्या विविध विभागांमध्ये महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. त्यानंतर, काही कालावधीने त्यांनी भारतीय वायुदलाच्या डिफेन्स सेक्युरिटी विभागात १३ वर्षे उत्कृष्ठ सेवा दिली. दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी ते बिदर येथील तळावरून सेवानिवृत्त झाले. उदगीर येथील आपल्या स्वगृही परतणार असल्याने पंचगल्ले परिवार आणि जिव्हाळा ग्रुपच्या वतीने त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली होती. त्यांचे आगमन झाल्यानंतर उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांनी शाल, श्रीफळ व पुष्पहाराने त्यांचे स्वागत केले. तसेच परिवारातील महिलांनी रांगोळी काढून औक्षण करत त्यांचे या यशाबद्दल औक्षण केले. चौकट : या स्वागत सोहळ्यात पशुशल्य चिकित्सक डॉ. अनिल भिकाने यांनी आपल्या भाषणात एका मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलाने जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या बळावर देशसेवेचा मिळालेला मान आणि त्यांच्या संघर्षमय प्रवासाचा गौरवपूर्ण आढावा घेतला. तसेच त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. चौकट : श्री. सुर्यकांत पंचगल्ले यांनी आपल्या ३५ वर्षांच्या सेवाकाळातील अनुभव उपस्थितांसमोर मांडले. देशसेवा करताना आलेले आव्हानात्मक प्रसंग, लष्करी शिस्त, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रप्रेम यावर त्यांनी प्रकाश टाकला. विशेष म्हणजे, आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात कोणत्याही प्रकारचे व्यसन न करता त्यांनी अत्यंत आदर्श व संयमी जीवन जगले आहे. युवकांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, "देशसेवा करा, शिस्तप्रिय बना आणि व्यसनांपासून दूर राहा. सेवानिवृत्तीनंतर उरलेले आयुष्य गावातील तरुणांना देशसेवा, राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधिलकी व एकोपा निर्माण करण्यासाठी समर्पित करेन."

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची विद्यार्थी परिषद निवडणूक संपन्न



**नाशिक :** - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात विद्यार्थी परिषद निवडणूक खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. विद्यापीठ विद्यार्थी परिषदेवर विजयी पदाधिकाÚयांचे विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. व्यंकट गिते., निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. देवेंद्र पाटील यांनी अभिनंदन केले. यावेळी विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. व्यंकट गिते यांनी विद्यापीठ विद्यार्थी परिषदेवरील नवनिर्वाचित पदाधिकाÚयांना विद्यापीठातर्फे शुभेच्छा दिल्या. यावेळी ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपले शैक्षणिक समस्या प्रतिनधींमार्फत विद्यापीठाकडे दिल्यास त्याचा तत्परतेने कार्यवाही करण्यात येईल. संशोधन, विविध विद्यार्थी कल्याणकारी योजना, शिष्यवृत्ती, क्रीडा व सांस्कृतिक आदींकरीता विद्यार्थ्यांकरीता काम करण्यात येईल. आरोग्य विषयक सामाजिक जनजागृतीकरीता आपला सहकार्य महत्वाचे आहे त्यासाठी विद्यापीठाच्या विविध उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा. विद्यापीठ प्रशासन व विद्यार्थी यांच्यात योग्य समन्वय रहावा यासाठी विद्यार्थी प्रतिनिधींची भूमिका महत्वपूर्ण असल्याचे त्यांनी संागितले. याबाबत निवडणुक निर्णय अधिकारी तथा विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी सांगितले की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम 1998 कलम 23(2)(टी) नुसार विद्यापीठाच्या अधिसभेवर तीन विद्यार्थी प्रतिनिधी निवडुन देण्याची तरतूद आहे. त्यानुसार निवडणूक प्रक्रियेव्दारे हिंगोली येथील डॉ. हेडगेवार स्मृती सेवा मंडळाचे दंत महाविद्यालयातील जायभावे आदित्य रामकिसन, मिरज येथील गुलाबराव पाटील होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालयातील मोकाशे लक्ष्मीकांत होनकालस व नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील मनगटे शुभंकर नितीन या तीन सदस्यांची विद्यापीठाच्या अधिसभेवर निवड झालेली आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम 1998 अन्वये विद्यापीठ विद्यार्थी परिषदेवर एक अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष, एक सचिव आणि दोन सहसचिव निवडून देण्याची तरतूद आहे. यानुसार विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्षपदी नंदुरबार येथील के.डी. गावीत कॉलेज ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाचा माळी रोहित मधुकर यांची बिनविरोध निवड झाली आहे तसेच उपाध्यक्षपदी पुणे येथील एम.ए.आर.आर.ई. कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचा काकड यशराज धनंजय आणि नागपूर येथील शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाचा माहोरे मिथीलेश श्रीकृष्णा यांची निवड झाली आहे. सचिव पदाकरीता नाशिक येथील आर.जे.एस. होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालयाचा आंधळे ज्ञानेश्वर रावसाहेब यांची बिनविरोध निवड झाली आहे तसेच सहसचिव पदाकरीता येवला येथील एस.एन.डी. कॉलेज ऑफ नर्सिंगचा पाटील केशव शरद आणि नागपूर येथील एस.डी. काळमेघ एस. दंत महाविद्यालयाची भुराने देवांशी प्रशांत यांची निवड झाली आहे. विद्यापीठ परिषद निवडणूकीकरीता उपस्थित सदस्यांना उपकुलसचिव श्री. महेंद्र कोठावदे यांनी निवडणूक प्रक्रियेबाबत माहिती दिली. निवडणूक प्रक्रियेनंतर त्वरीत मतमोजणी करुन विद्यापीठाचे कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी नवनिर्वाचित नावांची घोषणा केली.सदर निवडणूक प्रक्रिया पार पाडणेसाठी मा. कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. राजेंद्र बंगाळ, मतमोजणी तज्ज्ञ म्हणून विशेष कार्य अधिकारी श्री. फुलचंद अग्रवाल, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. देवंेद्र पाटील, उपकुलसचिव श्री. महेंद्र कोठावदे, विधी अधिकारी ॲड. संदीप कुलकर्णी, श्री. प्रकाश पाटील, सहायक कुलसचिव श्री. मिलिंद देशमुख उपस्थित होते. या निवडणुक प्रक्रियेकरीता विद्यापीठ अधिसभा व विद्यार्थी परिषदेवरील नवनिर्वाचित सदस्यांचे विद्यापीठ परिवाराकडून अभिनंदन करण्यात आले आहे.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ सप्टेंबर २०२६


## मराठा आरक्षणासाठी मुरूममध्ये कडकडीत बंद; टायर पेटवून सरकारचा निषेध!



**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या आमरण उपोषणाला समर्थन देण्यासाठी सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने गुरुवार, दि. ३ सप्टेंबर रोजी मुरूम शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले. धाराशिव जिल्हा व उमरगा तालुका बंदच्या धर्तीवर पुकारण्यात आलेल्या या बंदला शहरातील व्यापारी, दुकानदार, व्यावसायिक तसेच नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने प्रतिसाद देत आपला पाठिंबा दर्शविला. सकाळपासूनच शहरातील बहुतांश दुकाने व व्यावसायिक प्रतिष्ठाने बंद ठेवण्यात आली होती. दरम्यान, सकल मराठा समाजाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक ते महात्मा बसवेश्वर चौक, अण्णाभाऊ साठे चौक या मार्गावर घोषणा देत पायी रॅली काढण्यात आली. यावेळी 'एक मराठा, लाख मराठा', 'जरांगे पाटील आगे बढो, हम तुम्हारे साथ है', 'जय जिजाऊ, जय शिवराय', 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.रॅलीचा समारोप पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौकात करण्यात आला. यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी समाजबांधवांनी मनोगते व्यक्त करत मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारने ठोस निर्णय घेण्याची मागणी केली. यावेळी बोलताना समाजबांधवांनी सांगितले की, मराठा आरक्षणाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असून, मनोज जरांगे पाटील गेल्या अनेक वर्षांपासून या प्रश्नासाठी संघर्ष करीत आहेत. मात्र सरकारकडून या आंदोलनाची अपेक्षित गांभीर्याने दखल घेतली जात नसल्याची भावना समाजामध्ये आहे. मुरूम शहरातील काही समाजबांधवांना तहसील कार्यालयामार्फत कुणबी प्रमाणपत्रे देण्यात आली होती. मात्र त्यानंतर प्रमाणपत्राच्या वैधतेच्या प्रक्रियेत संबंधित कागदपत्रांवर प्रश्न उपस्थित करण्यात आल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. शासनानेच दिलेली कागदपत्रे नंतर बनावट कशी ठरू शकतात?, असा सवालही समाजबांधवांनी उपस्थित केला.मराठा आरक्षणाचा प्रश्न तातडीने मार्गी न लावल्यास आगामी काळात अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. यानंतर सकल मराठा समाजाच्या वतीने टायर पेटवून शासनाच्या धोरणांचा जाहीर निषेध करण्यात आला. या आंदोलनात श्रीकांत बेंडकाळे, हणमंत वागदरे, सुधीर चव्हाण, भीमराव फुगटे, संजय बेंडकाळे, हणमंत टेकाळे, श्रीधर इंगळे, संजय सावंत, अजित चौधरी, महेश पाटील, राहुल वाघ, सचिन शिंदे, लखन भोंडवे, गोविंद सोबाजी, विकास शिंदे, प्रवीण बिराजदार, विशाल मोहिते, संदीप टेकाळे, वैभव शिंदे, संदीप जाधव, अक्षय शिंदे, प्रल्हाद माने, ज्योतिबा शिंदे, बाळू गुळवे, नंदू शिंदे, सत्यम फुगटे, शुभम टेकाळे, मुकुंद सूर्यवंशी, महेश शिंदे, किशोर शिंदे, प्रतीक भोंडवे यांच्यासह सकल मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## स.भु.प्रशालेत अनुराधा पिंगळीकर यांचे कथाकथन रंगले




**छत्रपती संभाजीनगर :** येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेच्या पूर्व माध्यमिक विभागात साने गुरुजी कथामालेचा उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी कथाकथनकार अनुराधा पिंगळीकर यांनी कथामालाचे प्रथम पुष्प गुंफले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री विश्वरूप निकुंभ होते. साने गुरुजींच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. 'खरा तो एकची धर्म' हे साने गुरुजींचे प्रार्थना गीत प्रशालेच्या गीतमंचच्या विद्यार्थ्यांनी सादर केले. संगीत शिक्षिका सौ. माया कुलकर्णी आणि विद्यार्थी संचासोबत उपस्थित सर्व साडेतीनशे विद्यार्थ्यांनी या प्रार्थना गीताचे सामूहिक गायन केले. कथामालेच्या आयोजनामागची भूमिका मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ यांनी प्रास्ताविकातून मांडली. प्रमुख पाहुण्या अनुराधा पिंगळीकर यांचा परिचय डॉ. विनोद सिनकर यांनी करून दिला. विविध प्रकारच्या फुलांची गोष्ट अनुराधा पिंगळीकर यांनी अतिशय रंजक पद्धतीने विद्यार्थ्यांना सांगितली. कथा ऐकण्यात विद्यार्थी अतिशय तल्लीन झाले होते. प्रशालेच्या वाचन कट्टा भाषण कट्टा या उपक्रमांचे अनुराधा पिंगळीकर यांनी कौतुक आणि अभिनंदन केले. याप्रसंगी व्यासपीठावर सौ. अनुराधा पिंगळीकर, मुख्याध्यापक श्री. विश्वरूप निकुंभ, उपमुख्याध्यापक गिरीश देशमुख, प्र.पर्यवेक्षक विजय चापाईतकर, कथामालेचे डॉ. विनोद सिनकर, सौ. अंजली कोलते यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.स्रग्वी पाठक हिने केले तर सौ.अंजली कोलते यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. विजय पिंपळे, श्री. किशोर पाटील, निलेश नाईक, कु.देवश्री जोशी, कु. सौजन्या पवार, पृथा भाले आदींनी परिश्रम घेतले.


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


### आयुष्याची वाट

आयुष्याची वाट
काय तिचा थाट
चढणीचा घाट
जागोजागी

उन्हात पोळता
सावलीची आस
बालपण खास
वाटे आता

आता खेळ रोज
ऊन सावलीचा
दिस परीक्षेचा
ठरलेला

आशेचा किरण
घेऊन सोबत
चाले काळोखात
वाटसरू

कधी वाटेवर
फुलांची ती रास
काटे बरसात
रोजचीच

पडून उठावे
थांबू नये वाट
स्वप्नांची पहाट
उगवेल

**- ज्ञानेश्वर गायके, कन्नड**




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ सप्टेंबर २०२६

# शिक्षक : ज्ञानाचा दीप ते भविष्याचा शिल्पकार- डॉ. राजेंद्र बगाटे

५ सप्टेंबर हा दिवस देशभरात 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. शिक्षक दिन हा केवळ शिक्षकांना शुभेच्छा देण्याचा, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्याचा किंवा शाळा-महाविद्यालयांमध्ये औपचारिक कार्यक्रम आयोजित करण्याचा दिवस नाही. शिक्षणाचे व्यक्ती आणि समाजाच्या विकासातील महत्त्व समजून घेण्याचा, शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करण्याचा आणि भावी पिढी घडविण्याच्या प्रक्रियेत शिक्षकांच्या भूमिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याचा हा दिवस आहे. माणसाच्या जीवनात अनेक व्यक्ती येतात; परंतु त्याच्या विचारांना आकार देणाऱ्या, सुप्त क्षमतांना दिशा देणाऱ्या आणि आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या व्यक्तींमध्ये शिक्षकाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. शिक्षक विद्यार्थ्याला केवळ अक्षरज्ञान देत नाही, तर जीवनाकडे पाहण्याची दृष्टी देतो. प्रश्न विचारणे, विचार करणे, निर्णय घेणे, अडचणींना सामोरे जाणे आणि जबाबदारीने वागणे या जीवनकौशल्यांची जडणघडणही शिक्षणातूनच होते. त्यामुळे शिक्षक हा केवळ शिक्षणव्यवस्थेतील एक घटक नसून समाजाच्या भवितव्याला आकार देणारा शिल्पकार आहे.बालकाच्या समाजीकारण व व्यक्तिमत्त्वविकासात शाळेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे आणि या प्रक्रियेच्या केंद्रस्थानी शिक्षक असतो. विद्यार्थ्यांच्या मनात असंख्य प्रश्न, कल्पना आणि विविध क्षमता दडलेल्या असतात. काही विद्यार्थी अभ्यासात प्रगती करतात, काही कला-क्रीडा क्षेत्रात चमकतात, तर काही विज्ञान, तंत्रज्ञान, नेतृत्व किंवा सामाजिक कार्यात विशेष रस दाखवतात. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता आणि शिकण्याची पद्धत वेगळी असते. ती ओळखून योग्य संधी उपलब्ध करून देणे हे शिक्षकाचे खरे कौशल्य आहे. विद्यार्थ्यांच्या उणिवांवर भर देण्याऐवजी त्यांच्या सामर्थ्याचा शोध घेऊन त्यांना प्रोत्साहन देणारा शिक्षक त्यांच्या आयुष्याला सकारात्मक दिशा देऊ शकतो. विद्यार्थ्याला 'तू हे करू शकतोस' असा विश्वास देणे ही शिक्षकाच्या कार्यातील सर्वांत मोठी शक्ती आहे.आज शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. भ्रमणध्वनी, संगणक, इंटरनेट, इलेक्ट्रॉनिक पुस्तके, दृक्-श्राव्य माध्यमे, ऑनलाइन अभ्यासक्रम, डिजिटल वर्ग आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साधनांमुळे विद्यार्थ्यांच्या हातात माहितीचे प्रचंड भांडार उपलब्ध झाले आहे. त्यामुळे शिक्षकाची भूमिका केवळ माहिती देणाऱ्या व्यक्तीपुरती मर्यादित राहिलेली नाही. उपलब्ध माहितीची सत्यता तपासणे, योग्य-अयोग्य माहितीमधील फरक समजून घेणे, विविध स्रोतांचे मूल्यमापन करणे आणि माहितीचे ज्ञानात रूपांतर करणे ही कौशल्ये विद्यार्थ्यांना आत्मसात करून देणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. माहितीच्या महासागरात योग्य दिशा दाखविणारा शिक्षक आजही तितकाच आवश्यक आहे.तंत्रज्ञान शिक्षणाची प्रक्रिया अधिक सुलभ आणि व्यापक करू शकते; मात्र ते शिक्षकाच्या मानवी भूमिकेची जागा घेऊ शकत नाही. संगणक माहिती देऊ शकतो, कृत्रिम बुद्धिमत्ता प्रश्नांची उत्तरे देऊ शकते आणि डिजिटल माध्यमे अध्ययन सुलभ करू शकतात; परंतु विद्यार्थ्याच्या मनातील भीती ओळखणे, त्याच्या अडचणी समजून घेणे, अपयशानंतर त्याला पुन्हा उभे राहण्याची प्रेरणा देणे आणि त्याच्या क्षमतेवर विश्वास निर्माण करणे हे मानवी शिक्षकच करू शकतो. शिक्षक-विद्यार्थी संबंधातील विश्वास, संवाद आणि भावनिक जवळीक यांना तंत्रज्ञान पर्याय ठरू शकत नाही. म्हणून भविष्यातील शिक्षणात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करताना मानवी संवेदनशीलतेचा समतोल राखणे आवश्यक आहे.या बदलत्या शैक्षणिक वातावरणाचा विचार करताना ग्रामीण भारतातील वास्तवाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. शहरांमधील अनेक विद्यार्थ्यांना संगणक, इंटरनेट, डिजिटल वर्ग आणि विविध शैक्षणिक साधने सहज उपलब्ध असतात; परंतु ग्रामीण आणि दुर्गम भागातील परिस्थिती वेगळी आहे. अनेक कुटुंबांमध्ये एकच भ्रमणध्वनी असतो आणि तोही पालकांच्या दैनंदिन कामासाठी वापरला जातो. काही भागांत इंटरनेटची सुविधा मर्यादित असते, तर काही ठिकाणी वीजपुरवठ्याच्या अडचणींमुळे डिजिटल शिक्षणावर परिणाम होतो. त्यामुळे तंत्रज्ञानाधारित शिक्षणाचा विस्तार करताना डिजिटल दरी कमी करणे आवश्यक आहे. साधने उपलब्ध करून देण्याबरोबरच ती प्रभावीपणे वापरण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे.ग्रामीण शिक्षणाचे वास्तव मात्र डिजिटल साधनांच्या अभावापेक्षा अधिक व्यापक आहे. अनेक विद्यार्थी शेतकरी, शेतमजूर किंवा असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कुटुंबांतून येतात. शेतीचे हंगामी स्वरूप, पीकनुकसान, आर्थिक अडचणी, रोजगारासाठी होणारे स्थलांतर आणि घरातील जबाबदाऱ्या यांचा त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. शेतीच्या हंगामात काही मुलांना कुटुंबाला मदत करावी लागते, तर रोजगाराच्या शोधात कुटुंबाचे स्थलांतर झाल्यास त्यांच्या शिक्षणात खंड पडतो. अशा परिस्थितीत विद्यार्थ्याला 'अभ्यासात मागे' म्हणून दोष देण्याऐवजी त्याच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. अनेक ग्रामीण शिक्षक अशा विद्यार्थ्यांशी आणि त्यांच्या पालकांशी सातत्याने संवाद साधून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्याचे प्रयत्न करतात. मर्यादित साधनांमध्येही विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारा शिक्षक ग्रामीण समाजाच्या परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावतो.ग्रामीण शाळा ही केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणारी संस्था नसते; ती गावाच्या सामाजिक जीवनाचे महत्त्वाचे केंद्र असते. स्वच्छता, आरोग्य, पर्यावरणसंवर्धन, पाणीबचत, सामाजिक समता, लोकशाही मूल्ये आणि नागरिकत्वाची जाणीव निर्माण करण्यामध्ये शाळेचा मोठा वाटा असतो. शिक्षक विद्यार्थ्यांसोबतच पालक आणि ग्रामसमाजाशी संवाद साधत असल्याने त्याचे कार्य वर्गखोलीच्या पलीकडे विस्तारते. विशेषतः ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणासाठी शिक्षकाची भूमिका अधिक संवेदनशील ठरते. घरकामाची जबाबदारी, शाळेचे अंतर, सुरक्षित वाहतुकीचा अभाव, आर्थिक अडचणी आणि काही सामाजिक रूढी यांमुळे मुलींच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ शकतात. अशा वेळी पालकांमध्ये शैक्षणिक जाणीव निर्माण करणे, मुलींना सुरक्षित वातावरण देणे आणि त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे हे शिक्षकाचे सामाजिक कर्तव्य ठरते. एका मुलीला शिक्षणाची संधी मिळणे म्हणजे तिच्यासोबत संपूर्ण कुटुंबाच्या आणि पुढील पिढीच्या विकासाच्या शक्यता वाढणे होय.शिक्षणाचा उद्देश केवळ परीक्षेत चांगले गुण मिळविणे एवढाच नसावा. गुण, श्रेणी आणि निकाल यांना महत्त्व असले तरी ते विद्यार्थ्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे मोजमाप करू शकत नाहीत. एखादा विद्यार्थी गणित किंवा विज्ञानात प्रावीण्य मिळवू शकतो, तर दुसरा साहित्य, संगीत, चित्रकला, क्रीडा, अभिनय किंवा सामाजिक कार्यात उत्कृष्ट ठरू शकतो. विद्यार्थ्यांची जिज्ञासा, सर्जनशीलता, चिकित्सक विचार, सहकार्याची वृत्ती, समस्या सोडविण्याची क्षमता आणि सामाजिक संवेदनशीलता यांनाही शिक्षणात समान महत्त्व मिळाले पाहिजे. शिक्षकाने विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी नव्हे, तर जीवनासाठी तयार केले पाहिजे. प्रत्येक मुलामध्ये असलेली वेगळी क्षमता शोधून तिला योग्य दिशा देणे हीच शिक्षणाची खरी कसोटी आहे.शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चिकित्सक विचारांची जडणघडण होणेही आवश्यक आहे. अफवा, चुकीची माहिती, अंधानुकरण आणि पूर्वग्रह वेगाने पसरत असताना प्रत्येक गोष्ट विवेकाने तपासण्याची सवय विद्यार्थ्यांना लागली पाहिजे. 'हे असे का?' हा प्रश्न विचारण्याची वृत्ती ज्ञानाची पहिली पायरी आहे. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारावेत, मतभेद व्यक्त करावेत, माहितीची चिकित्सा करावी आणि स्वतःच्या निष्कर्षापर्यंत पोहोचावे, यासाठी शिक्षकाने त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. प्रश्न विचारणारा विद्यार्थी त्रासदायक नसतो; तो जिज्ञासू असतो. अशा जिज्ञासेतूनच संशोधन, नवोन्मेष आणि सर्जनशील विचारांची निर्मिती होते.शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृती असल्याने शिक्षकाची भूमिका सामाजिक समता आणि न्यायाच्या निर्मितीतही महत्त्वाची आहे. विविध सामाजिक, आर्थिक, भाषिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीची मुले एकत्र शिकतात. या विविधतेतून समानता, सहकार्य आणि बंधुभावाची जाणीव निर्माण करण्याची संधी शिक्षकाला मिळते. कोणत्याही विद्यार्थ्याशी त्याच्या सामाजिक किंवा आर्थिक परिस्थितीवरून भेदभाव होऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. समावेशक शिक्षणाच्या काळात दिव्यांग विद्यार्थी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थी, ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थी, विविध भाषिक पार्श्वभूमीची मुले आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना समान संधी देणे ही शिक्षणव्यवस्थेची जबाबदारी आहे. एखाद्या विद्यार्थ्याला शिकताना अडचण येत असेल, तर त्याला 'कमकुवत' ठरविण्याऐवजी त्याच्या शिकण्याची पद्धत समजून घेणे आणि आवश्यक ते वैयक्तिक मार्गदर्शन देणे अधिक योग्य ठरते.या सर्व अपेक्षा पूर्ण करण्यासाठी शिक्षकांना अनुकूल कार्यपरिस्थिती मिळणेही आवश्यक आहे. गुणवत्तापूर्ण अध्यापनाची अपेक्षा करताना शिक्षकांना आवश्यक शैक्षणिक साधने, प्रशिक्षण, पुरेसा वेळ आणि सर्जनशीलतेला वाव देणारे वातावरण मिळते का, याचाही विचार झाला पाहिजे. अध्यापनाबरोबर विविध प्रशासकीय कामांचा वाढता भार शिक्षकांवर पडत असेल, तर त्याचा परिणाम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणाऱ्या वेळेवर होऊ शकतो. शिक्षकाला केवळ आदेशांचे पालन करणारा कर्मचारी न मानता शैक्षणिक प्रक्रियेतील महत्त्वाचा बौद्धिक घटक म्हणून पाहणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक अध्यापनपद्धती, समावेशक शिक्षण आणि नवीन मूल्यमापन पद्धती याबाबत शिक्षकांना सातत्यपूर्ण प्रशिक्षण मिळाले पाहिजे. स्वतः सतत शिकणारा शिक्षकच विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची प्रेरणा निर्माण करू शकतो.आजच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजांकडेही संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे. अभ्यासाचा ताण, स्पर्धा, पालकांच्या अपेक्षा, सामाजिक माध्यमांचा प्रभाव आणि करिअरविषयीची चिंता यामुळे अनेक विद्यार्थी मानसिक दबाव अनुभवत असतात. काहींना आपल्या अडचणी व्यक्त करता येत नाहीत. अशा वेळी शिक्षकाचा संवेदनशील संवाद विद्यार्थ्यासाठी मोठा आधार ठरतो. 'तुझा निकाल काय?' या प्रश्नाबरोबरच 'तुला काही अडचण आहे का?' हा प्रश्न विचारण्याची संवेदनशीलताही शिक्षणाचा भाग आहे. विद्यार्थ्याच्या प्रगतीसाठी पालक आणि शिक्षक यांच्यातील सहकार्य तितकेच महत्त्वाचे आहे. केवळ गुणांवर आधारित तुलना करण्याऐवजी विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार त्याच्या प्रगतीकडे पाहिले पाहिजे. घर आणि शाळा या दोन्हीकडून प्रोत्साहन मिळाल्यास विद्यार्थ्याचा आत्मविश्वास अधिक दृढ होतो.पर्यावरणीय संकटे, पाण्याची समस्या, हवामानातील बदल, सामाजिक विषमता, बेरोजगारी, डिजिटल गैरवापर आणि वाढती सामाजिक असहिष्णुता यांसारख्या प्रश्नांसमोर आजचा समाज उभा आहे. या समस्यांना सामोरे जाण्यासाठी केवळ तांत्रिक ज्ञान पुरेसे नाही; सामाजिक संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीवही आवश्यक आहे. पर्यावरणाचे संरक्षण, सार्वजनिक संपत्तीचे जतन, सामाजिक सहकार्य, संविधानिक मूल्ये आणि नागरिक म्हणून असलेली कर्तव्ये यांची जाणीव विद्यार्थ्यांना करून देणे ही शिक्षकाची व्यापक सामाजिक जबाबदारी आहे. आजच्या वर्गखोलीतून उद्याचा समाज घडत असतो. त्यामुळे शिक्षकाचे अध्यापन आणि त्याचे आचरण या दोन्हींचा विद्यार्थ्यांवर दीर्घकालीन प्रभाव पडतो.शिक्षकाला दिलेली खरी आदरांजली म्हणजे केवळ शिक्षक दिनाच्या दिवशी शुभेच्छा देणे नव्हे. शिक्षकांनी दिलेल्या ज्ञानाचा आणि मूल्यांचा आपल्या जीवनात उपयोग करणे हीच त्यांच्याप्रती खरी कृतज्ञता आहे. एखादा विद्यार्थी प्रामाणिकपणे काम करतो, अडचणीत असलेल्या व्यक्तीला मदत करतो, अन्यायाविरुद्ध आवाज उठवतो, स्वतःच्या यशाबरोबर समाजाचाही विचार करतो आणि संकटांना धैर्याने सामोरा जातो, तेव्हा त्याच्या वर्तनातून शिक्षकाच्या कार्याचे खरे प्रतिबिंब दिसते. शिक्षकाच्या कार्याचे अंतिम यश केवळ गुणपत्रिकेत नव्हे, तर विद्यार्थ्याच्या विचारांत, वर्तनात आणि जीवनमूल्यांत दिसून येते.शिक्षक दिन हा त्यामुळे शिक्षकांचा गौरव करण्याबरोबरच शिक्षणव्यवस्थेच्या भवितव्याचा विचार करण्याचा दिवस आहे. समाजाने शिक्षकांकडून मोठ्या अपेक्षा ठेवताना त्यांना आवश्यक साधने, प्रशिक्षण, सन्मान आणि विश्वास देणेही गरजेचे आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जबाबदारी केवळ शिक्षकांवर सोपवून समाजाची भूमिका संपत नाही. शासन, शिक्षणसंस्था, पालक, विद्यार्थी आणि समाज या सर्वांनी शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांना आवश्यक पायाभूत सुविधा, सक्षम शिक्षकवर्ग आणि डिजिटल साधने उपलब्ध करून देणे ही सामाजिक गुंतवणूक आहे. शिक्षणाची गुणवत्ता सुधारली तर त्याचा लाभ केवळ विद्यार्थ्यांना होत नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासाला मिळतो.शिक्षक हा वर्तमानातील विद्यार्थ्याला भविष्याशी जोडणारा दुवा आहे. तो अज्ञानातून ज्ञानाकडे, भीतीतून आत्मविश्वासाकडे, अंधानुकरणातून चिकित्सक विचाराकडे आणि स्वकेंद्रिततेतून सामाजिक जबाबदारीकडे नेणारी वाट दाखवतो. त्याच्या हातात केवळ पुस्तक किंवा अध्यापनाचे साधन नसते; भावी समाज घडविण्याची जबाबदारीही असते. म्हणून शिक्षकाचा सन्मान हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून ज्ञानाचा, शिक्षणाचा आणि समाजाच्या भवितव्याचा सन्मान आहे.५ सप्टेंबरचा शिक्षक दिन एका दिवसापुरत्या औपचारिक शुभेच्छांमध्ये अडकून राहू नये. प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण आणि समताधिष्ठित शिक्षण मिळावे, प्रत्येक शिक्षकाला सन्मानपूर्वक व अनुकूल कार्यपरिस्थिती मिळावी, ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांना आवश्यक सुविधा मिळाव्यात, डिजिटल दरी कमी व्हावी, विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा आणि शिक्षणातून संवेदनशील, विवेकी व जबाबदार नागरिक घडावेत, हा व्यापक संकल्प या दिवसातून पुढे यायला हवा. शिक्षकाच्या हातातील खडू, लेखणी किंवा डिजिटल साधन हे केवळ अध्यापनाचे माध्यम नसते; त्यातून एका पिढीच्या विचारविश्वाची निर्मिती होत असते. म्हणूनच शिक्षक हा केवळ वर्गखोलीतील अध्यापक नसून उद्याच्या समाजाचा शिल्पकार आहे. ज्ञानाचा दीप प्रज्वलित करणाऱ्या शिक्षकांच्या कार्याला मनःपूर्वक अभिवादन करणे, त्यांच्या कार्याला सक्षम वातावरण उपलब्ध करून देणे आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या स्वप्नांना समान संधी देणे हीच शिक्षक दिनाची खरी सार्थकता ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**bagate.rajendra5@gmail.com**